कार्यकारी प्राधिकरणे विभाग

## मुंबई विद्यापीठ

क्र.काप्रावि/कार्यवाही/७९/२०१२

**परिपत्रक :**

व्यवस्थापन परिषदेने दिनांक २८ जून, २०१२ च्या सभेत विद्यापीठ अधिकारी आणि संबंधित विभाग प्रमुख यांच्याकडून आलेल्या प्रत्येक बाबीवर घेतलेले निर्णय मूळ कागदपत्रासह संबंधित विभागाकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. त्यांना अशी विनंती करण्यात येते की, विभागाने त्या निर्णयावर कार्यवाही करून त्यासंदर्भात संबंधिताना पाठविलेली पत्रे/परिपत्रके/आदेश यांच्या प्रती (असल्यास) या विभागाने पाठविलेल्या परिपत्रकाचा क्रमांक व तारीख तसेच व्यवस्थापन परिषदेच्या सभेची तारीख आणि बाब क्रमांक यांचा उल्लेख यासह कार्यवाही अहवाल दिनांक २ ऑगस्ट, २०१२ रोजी किंवा तत्पूर्वी सहायक कुलसचिव, कार्यकारी प्राधिकरणे विभाग यांच्याकडे पाठवावा.

| विभाग | बाब क्रमांक | घेणा-याची सही |
|---|---|---|
| संचालक.......<br>पश्चिम क्षेत्रिय उपकरण विज्ञान केंद्र (W.R.I.C.) | ४ | [signature] |
| प्रभारी परीक्षा नियंत्रक......<br>परीक्षा विभाग<br>(Examinations Section) | ३, १६ | २९/६/२०१२ ms पाठविले. |
| वित्त व लेखा अधिकारी....<br>वित्त व लेखा विभाग<br>(Accounts Section) | ७ | [signature] 29/07/2012 |
| विद्यापीठ अभियंता.....<br>(विद्यापीठ विकास क्षेत्र विभाग)<br>(CDU) | ~~९~~<br>२५ एप्रिल, २०१२ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेतील बाब क्र. १ मधील सुधारीत ठराव (Sent on 19th July, 2012) | [signature] 21/07/2012 |
| उप-कुलसचिव........<br>आस्थापना विभाग<br>(Establishment Section) | १९, २०, ६ | [signature] 21/07/12 |
| उप-कुलसचिव..........<br>संलग्नता/मान्यता विभाग<br>(Affiliation Section) | ११, १८ | [signature] 21/7/12 |
| उप-कुलसचिव..........<br>घटक महाविद्यालये कक्ष<br>(Concol Section) | ~~२५~~ | [signature] 21/7/12 |
| उपकुलसचिव........<br>विद्याविषयक प्राधिकरणे विभाग<br>(A.A.U.) | १२, १३, १४ (Send on 18th July, 2012) | |
| उप-कुलसचिव........<br>नोंदणी, पात्रता व स्थलांतर विभाग<br>(Enrollment,Eligibility & Migration) | २५ एप्रिल, २०१२ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेतील बाब क्र. १ मधील सुधारीत ठराव (Sent on 19th July, 2012) | |
| सहायक कुलसचिव......<br>(विद्याविषयक नियोजन कक्ष)<br>(APD) | १० | [signature] 21/7/12 |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| अधिक्षक.....<br>प्रबंध विभाग<br>(Thesis section) | ८ | |

मुंबई - ४०० ०३२,
२० जुलै, २०१२.

कुलसचिवाकरिता.

Scanned by CamScanner

मसुदा

क्र.३/२०१२-२०१३

गोपनीय

व्यवस्थापन परिषद

२८ जून, २०१२

# मुंबई विद्यापीठ

व्यवस्थापन परिषदेची सभा विद्यापीठाचे सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई- ४०० ०३२, येथे *गुरूवार दिनांक २८ जून, २०१२ रोजी सकाळी ११.३०* वाजता सुरू झाली. सभेमध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

१. डॉ. राजन वेळूकर (कुलगुरू)
२. डॉ. नरेश चंद्र (प्र-कुलगुरू)
३. डॉ. सुरेश कि. उकरंडे
४. श्री. दयानंद मेश्राम, (सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय)
५. डॉ. प्रल्हाद जी. जोगदंड
६. प्राचार्य (डॉ.) राजपाल एस. हांडे
७. प्राचार्य दत्ताजीराव यशवंतराव पाटील
८. प्राचार्य गोरक्ष व्ही. पारगांवकर
९. डॉ. बाळकृष्ण विठ्ठल भोसले
१०. डॉ. वसंत सिताराम शेकडे
११. डॉ. (श्रीमती) मधु सुधीर परांजपे
१२. श्री. गजानन (उर्फ) दिलीप अंबाजी करंडे
१३. प्राचार्य (डॉ) अशोक पां. महाजन
१४. डॉ. विजय भालचंद्र जोशी
१५. डॉ. सिध्देश्वर तुकाराम गडदे
१६. श्री. संजय बा. शेटे

श्री. भा.ल.राठोड, वित्त व लेखा अधिकारी हे कायम निमंत्रित म्हणून सभेस उपस्थित होते.

सर्वप्रथम कुलगुरूंनी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे स्वागत केले.

सभेला सुरूवात करताना कुलगुरूंनी सांगितले की, डॉ. गुरूनाथ वा. पंडीत, यांनी कळविले आहे की, ते या सभेस उपस्थित राहू शकणार नसल्याने त्यांना या सभेत अनुपस्थित राहण्यास परवानगी द्यावी. अशी त्यांनी विंनती केली आहे.

व्यवस्थापन परिषदेने डॉ. गुरूनाथ वा. पंडीत, यांची या सभेस अनुपस्थित राहण्याची विंनती मान्य केली.

यानंतर, श्री. प्रकाश मोहाडीकर तसेच व्यवस्थापन परिषदेचे सदस्य श्री. संजय बा. शेटे यांच्या मातोश्री काशिबाई बाबूराव शेटे यांच्या दु:खद निधनाबद्दल परिषदेस पुढीलप्रमाणे माहिती देण्यात आली व श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

➢ **श्रध्दांजली –**

**श्री. प्रकाश मोहाडीकर**

➢ आंतरभारतीची संकल्पना मांडून त्या संकल्पनेचा ध्यास घेतलेले ज्येष्ठ स्वांतत्र्यसैनिक, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि माजी आमदार श्री. प्रकाश मोहाडीकर यांचे दि. १९ मे २०१२ रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९४ वर्षांचे होते.

Scanned by CamScanner

## कै. काशिबाई बाबुराव शेटे

➢ मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे प्रमुख कार्यवाह मा. श्री. संजय बाबूराव शेटे यांच्या मातोश्री आणि मंडळाच्या जडणघडणीत वैशिष्ट्पूर्ण योगदान देणारे कै. बाबूरावजी शेटे यांच्या अर्धांगिनी श्रीमती काशिबाई बाबूरावजी शेटे यांचे दिनांक १२ मे, २०१२ रोजी दु:खद निधन झाले.

➢ मंत्रालयात लागलेल्या भीषण आगीत मृत्यू पावलेल्यांना श्रद्धांजली अर्पण करावी. तसेच मंत्रालयात भीषण आग लागलेली असताना आपला जीव धोक्यात घालून मंत्रालयावरील राष्ट्रीय ध्वजाचे रक्षण करणा-या कर्तव्यदक्ष व धाडसी कर्मचा-यांचे मुंबई विद्यापीठाने सत्कार करावा अशी सूचना श्री. दिलीप करंडे यांनी मांडली.

मंत्रालयात लागलेल्या भीषण आगीत मृत्यू पावलेल्यांना सभागृहाने दोन मिनीटे उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली.

मंत्रालयात भीषण आग लागलेली असताना आपला जीव धोक्यात घालून मंत्रालयावरील राष्ट्रीय ध्वजाचे रक्षण करणा-या कर्तव्यदक्ष व धाडसी कर्मचा-यांचे मुंबई विद्यापीठाच्या दिनांक १८ जुलै, २०१२ रोजी होणा-या १५६ व्या वर्धापन दिना दिवशी सत्कार करण्याचा ठराव करण्यात आला.

<u>बाब १:</u> दिनांक २५ एप्रिल, २०१२ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचे इतिवृत्त खालील सुधारणांसह सभागृहाने मान्य केले व नंतर कुलगुरूंनी इतिवृत्तावर स्वाक्षरी केली.

<u>दिनांक २५ एप्रिल, २०१२</u>

<u>पान क्र.६</u>

बाब क्र. १६ पुढील प्रमाणे वाचावे.

"*Resolved* that the draft Memorandum of Understanding (MoU) to be executed between the University of Mumbai and Bombay University and College Teachers Union (BUCTU) submitted by the BUCTU <u>be accepted.</u>"

<u>पान क्र.२९</u>

बाब क्र. २४ पुढील प्रमाणे वाचावे.

"इम्कॉस्ट महाविद्यालय, ठाणे यांनी प्रथम वर्ष बी.एम्.एस्. या अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१०-११ मध्ये सहा विद्यार्थ्यांना अध्यादेश क्र. ०.३९४१ चे उल्लंघन करून चुकीचे प्रवेश दिले होते; त्याबद्दल दिनांक २३ डिसेंबर, २०११ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत बाब क्र. ७ नुसार रु ५०,०००/- दंड आकारण्यात आला.

पुढे असाही ठराव करण्यात आला की, "इम्कॉस्ट महाविद्यालय, ठाणे साठी पुढील तीन शैक्षणिक वर्षाकरिता नवीन अभ्यासक्रम/प्रोग्राम मंजूर करू नये याबाबतचा दिनांक २३ डिसेंबर, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेचा निर्णय रद्द करण्यात यावा.

<u>बाब २:</u> असा ठराव करण्यात आला की, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेच्या इतिवृत्तावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात यावी.

<u>बाब ३:</u> विद्यापीठाकडून विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यासाठी भविष्यात येणा-या खर्चाचा सखोल अभ्यास करून देणगीदारांकडून किती देणगी स्विकारावी यासाठी गठीत केलेल्या समितीच्या अहवालावर सखोल चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, महाविद्यालगातील गुणवंत विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या पारितोषिकासाठीची देणगी विद्यापीठाने स्विकारू नये.

Scanned by CamScanner

पुढे असा ठराव करण्यात आला की, श्री. एम्. जी. फडके यांना बी.एन्.एन्. महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिकासाठी देणगी दयावयाची असल्यास त्यांनी ती देणगी बी.एन्.एन्. महाविद्यालयास दयावी.

पुढे असाही ठराव करण्यात आला की, पारितोषिकाच्या रक्कमेवर भविष्यात येणा-या खर्चाचा रेडी रेकनर (Ready Reckoner) तयार करण्यासाठी सदर समितीस विनंती करण्यात आली व रेडी रेकनरसहीत अंतिम अहवाल लवकरात लवकर व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करावा.

बाब ४: असा ठराव करण्यात आला की, पश्चिम क्षेत्रिय उपकरण विज्ञान केंद्र (प.क्षे.उ.वि.के.) च्या अधिशासक परिषदेवर (गव्हर्निंग कौन्सिल) एक उद्योजक नामनिर्देशित करण्याचे अधिकार कुलगुरूंना देण्यात यावे.

बाब ५: असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठाच्या सेवेतून निवृत्त होणारे शिक्षकेतर कर्मचारी आणि अधिकारी यांना ५ ग्रॅम सोन्याचे वळे देण्याबाबत पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात यावा.

१. विद्यापीठातील अधिका-यांना ही योजना लागू होणार नाही.

२. विद्यापीठ सेवेतून स्वेच्छानिवृत्ती (VRS) घेणा-या कर्मचा-यास हया योजनेचा लाभ घेता येणार नाही. स्वेच्छानिवृत्ती दिर्घ आजाराने असल्यास सदर बाब व्यवस्थापन परिषदेपुढे विचारार्थ सादर करावी.

३. आकस्मित मृत्यू झालेल्या कर्मचा-यांच्या कायदेशिर वारसांना सदर योजनेचा लाभ देण्यात यावा.

४. वर्ग २, ३ आणि ४ कर्मचा-यांना निवृत्तीच्या वेळी ५ ग्रॅम सोन्याऐवजी सध्याच्या बाजारभावाप्रमाणे ५ ग्रॅम सोन्याची रक्कम (अंदाजे रू. १५,०००/-) गृहीत धरून पुढील पाच वर्षासाठी सदर रक्कमेत येणारे सोने भेटवस्तू म्हणून देण्यात यावे.

बाब ६: असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचा-यांना मिळणा-या उत्सव अग्रिम रक्कम (Festival Advance) रू. १०,०००/- ऐवजी वाढ करून रू. १२,०००/- मंजूर करण्यात यावे.

पुढे असा ठराव करण्यात आला की सदर वाढीव अग्रिम रक्कमेत पुढील पाच वर्षासाठी कोणताही बदल करण्यात येणार नाही.

बाब ७: असा ठराव करण्यात आला की, वित्त व लेखा समितीने दिनांक १८ मे, २०१२ रोजीच्या सभेत केलेल्या शिफारशी बाब क्रमांक ३ च्या खालील सुधारणांसहित मान्य करण्यात आल्या.

''असा ठराव करण्यात आला की, व्यवस्थापन परिषदेस अशी शिफारस करण्यात यावी की, चतुर्थ श्रेणी पुरूष कर्मचा-यांना पूर्वी प्रमाणेच प्रत्येकी पाच वर्षांनी टेरीवूलचा गणवेष (पँट व शर्ट) देण्यात यावा.

पुढे असा ठराव करण्यात आला की, वरील कालावधीसाठी अखंडीत/कायम सेवेत असलेल्या (Continuos/Permanent) वर्ग ४ च्या पुरूष कर्मचा-यांना चांगल्या प्रतीचा प्रत्येकी एक स्वेटर देण्यात यावा तसेच वर्ग ४ च्या महिला कर्मचा-यांना चांगल्या प्रतीची एक शाल देण्यात यावी.''

Item 8: *Resolved* that the recommendation made by the Academic Council at its meeting held on 10th February, 2012 vide item No. 7.1 regarding to granting the permission for Permanent Recognition to St. Xavier's College, Mumbai-400 001 to enroll 10+10 additional students (Total 20) for M.Sc.(By Research ) & Ph.D. (Science) degree in the subject of Botany from the academic Year 2009-2010 onwards be accepted.

Scanned by CamScanner

पुढे असाही ठराव करण्यात आला की, सर्व अधिष्ठातांची समिती गठीत करून स्थानिक चौकशी समितीचे प्रलंबित अहवाल किंवा समिती पाठविण्यासाठी प्रलंबित असलेल्या प्रकरणाचा आढावा घेऊन समितीने दोन महिन्याचाआत संपूर्ण आराखडा तयार करून कार्यवाही अहवाल तयार करावा.

Item 9: *Resolved* that the minutes of the Building and works Committee at its meetings held on 9th March, 2012, 28th May, 2012 and circulation on 23rd June, 2012 be accepted.

Further it was resolved that structure audit of all the twenty years & above old buildings should be carried out.

Item 10: *Resolved* that the following persons are nominated to attend workshops on "Approach to Leadership Development with emphasis on Education, Health care & Business sector" at Harvard University.

1. Dr. Naresh Chandra
2. Dr. Rajpal S. Hande
3. Dr. Pralhad G. Jogdand
4. Dr. Dattajirao Y. Patil
5. Dr. Vijay B. Joshi
6. Dr. Siddheshwar T. Gadade
7. Dr. Goraksha V. Pargaonkar

Further *resolved* that the expenditure incurred on the Hon'ble members will be borne by their respective institutes/colleges.

बाब ११: असा ठराव करण्यात आला की, उच्च न्यायालयाच्या दिनांक ३० नोव्हेंबर, २०१० आणि १५ डिसेंबर, २०१० रोजीच्या आदेशानुसार कुलगुरूंनी श्री. टेकचंद जे. शाह यांच्या सुनावणीसाठी गठीत केलेल्या समितीने सदर सुनावणीवर त्यांचा अहवाल सादर न केल्यामुळे सदर समितीस त्यांचा अहवाल पुढील व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करण्यात यावा असे सुचविण्यात आले.

बाब १२: असा ठराव करण्यात आला की, विद्वत परिषदेने दि. ६ जून, २०१२ च्या सभेत बाब क्र. ४.३, ४.४, ४.५, ४.१३, ४.१४, ४.१७, ४.२०, ४.२१, ४.२२, ४.२४, ४.७०, ४.७१, ४.७२, ४.७३, ४.७४, ४.८३, ४.८४, ४.८५, ४.८६, ४.९३, ४.१०२, ४.११६, ४.१२०, ४.१२७, ४.१३५, ४.१३६, ४.१३९ आणि ४.१४०. बाबत केलेल्या शिफारशी मान्य करण्यात याव्यात.

बाब १३: असा ठराव करण्यात आला की, विद्वत परिषदेने दि. ६ जून, २०१२ च्या सभेत बाब क्र. ३.३, ३.१२, ३.२०, ७.१, ७.२, ७.३, ७.४, ७.५ आणि ८.१ बाबत केलेल्या शिफारशी बाब क्र. ७.३ वगळून मान्य करण्यात यावा. बाब क्र. ७.३ पुर्नविचारार्थ विद्वत परिषदेपुढे सादर करावा.

पुढे असा ठराव करण्यात आला की, रिव्हयु समितीचा अहवाल जुलै महिन्यात होणा-या विद्वत परिषदेत विचारार्थ सादर करावा.

बाब १४: असा ठराव करण्यात आला की, विद्वत परिषदेने दि. १९ मार्च, २०१२ च्या सभेत बाब क्र. ४.१६ आणि ४.७६ बाबत केलेल्या शिफारशी मान्य करण्यात याव्यात.

पुढे असाही ठराव करण्यात आला की, एम्.ए./एम्.एस्.सी (Statistics) च्या प्रवेश प्रक्रियेत आरक्षित असलेल्या जागांसाठी गुणवत्ता यादी लावावी. आरक्षणाबाबत शासनाच्या निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करून प्रवेश देण्यात यावा. तसेच रिक्त जागांबाबत विद्वत परिषदेने निर्णय घ्यावा.

Scanned by CamScanner

बाब १५: असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय कमांक संकीर्ण- २०१०/(४८८/१०)विशि-१, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. दिनांक १५ फेब्रुवारी, २०११ आणि महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय कमांक संकीर्ण २०१०/(४८८/१०)विशि-1, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ दिनांक २८ डिसेंबर, २०१० च्या अनुषगांने महाविद्यालयातील शिक्षकेतर अधिकारी/कर्मचा-यांना सुधारीत सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या शिफारसी दिनांक १ ऑक्टोबर, २००६ पासून लागू करावी.

Item 16 : *Resolved* that the Dr. Balkrishna V. Bhosale be nominated as member on Selection Committee for award of the President of India, Dr. Shanker Dayal Sharma Gold Medal for the year 2012.

बाब १७: असा ठराव करण्यात आला की, दिनांक १८ फेब्रुवारी, २०१२ रोजी संपन्न झालेल्या तक्रार निवारण समितीच्या ठरावास मान्यता देण्यात यावी.

पुढे असाही ठाराव करण्यात आला की, तक्रार निवारण समितीने दिलेला निर्णय दोन्ही पक्षांना पत्र लिहून मान्य आहे किंवा नाही. याबाबत १५ दिवसात कळविण्याची विनंती करण्यात यावी. पत्रास उत्तर १५ दिवसात न दिल्यास तक्रार निवारण समितीचा निर्णय मान्य आहे असे समजण्यात येईल व मान्य नसल्यास दोन्ही पक्षांना व्यवस्थापन परिषदेपुढे सुनावणीसाठी संधी दयावी तसेच व्यवस्थापन परिषदेचा निर्णय त्यांना बांधिल राहिल.

पुढे असा ठराव करण्यात आला की, परिपत्रका मध्ये सुधारणा करण्यासाठी खालील सभासदांची समिती गठीत करण्यात आली.

१) डॉ. विजय भालचंद्र जोशी
२) डॉ. (श्रीमती) मधु सुधीर परांजपे
३) श्री. गजानन (उर्फ) दिलीप अंबाजी करंडे
४) प्राचार्य गोरक्ष व्ही. पारगांवकर
५) कुलसचिव

बाब १८: असा ठराव करण्यात आला की, अथर्व एज्युकेशन ट्रस्टचे, अथर्व कॉलेज ऑफ हॉस्पीटॅलिटी स्टडीज, मालाड महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०१२-१३ करीता नविन अभ्यासक्रम बी.एस्.सी.(आय.टी.), बी.एम्.एस्. आणि बी.एम्.एम्. सुरू करणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करण्यात यावा.

बाब १९: प्रमाणसंहिता नियमावली, १९८४ कलम ४(२)(अ) आणि (ब) मधील तरतुदी अन्वये शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१०-(३१२-२०१०)-विशि-१, दिनांक २० मे, २०१० संदर्भातील आस्थापना परिपत्रक क्रमांक आस्था २(४)/घम/१४५/२०१०, दिनांक २ जुलै, २०१० नुसार वर्ग १ साठी डॉ. डी. वाय. पाटील आणि प्रा. (श्रीमती) मधू सु. परांजपे यांचे नामनिर्देशन करण्यात आले तसेच वर्ग २ साठी डॉ. गोरक्ष व्ही. पारगांवकर यांचे नामनिर्देशन करण्यात आले.

पुढे असाही ठराव करण्यात आला की, वर्ग १ व वर्ग २ च्या निवड प्रक्रियेसाठी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन आळीपाळीने देण्यात यावे.

बाब २०: असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठातील वाहन चालकांना ८ तासापेक्षा जास्त काम करावे लागल्यास कार्यालयीन वेळेआधी आणि कार्यालयीन वेळेनंतर किंवा रविवार व इतर सुट्टीच्या दिवशी काम केल्यास रू. ४०/- प्रती तास दराने अतिकालिक भत्ता देण्यात यावा. तसेच सदर भत्ता कायम तसेच हंगामी व रोजंदारीवरील सर्व वाहन चालकांना अनुज्ञेय राहील.

मुंबई- -४०० ०३२
१८ जुलै, २०१२.

श्री. कुमार खैरे
कुलसचिव

Scanned by CamScanner